दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.२४ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ३९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 24 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 39 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## राज्यात ४ लाख हेक्टर शेती पाण्याखाली

**मुंबई–**गेल्या काही दिवसांत राज्यात मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागांमध्ये शेतजमिनी पाण्याखाली गेल्याने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. परिणामी शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून, नुकसानभरपाईसाठी सरकारकडे मागणी होत आहे. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळेल, असे आश्वासन दिले आहे. मात्र या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.वडेट्टीवार म्हणाले की, राज्यातील जवळपास ३४ लाख हेक्टर शेती उद्ध्वस्त झाली आहे. सरकार निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार मदत करणार की, नवा जीआर काढून शेतकऱ्यांची फसवणूक करणार? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पिक विमा योजनेवर टीका करताना ते म्हणाले की, शेतकऱ्यांकडून पैसे घेऊन सरकारने विम्याचे सोंग केले, मात्र अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान या योजनेत बसतच नाही.

# पीक नुकसानीसाठी २,२१५ कोटींची मदत मंजूर

# राज्यातील ३२ लाख शेतकऱ्यांना दिलासा

## पैसे ८-१० दिवसांत बँक खात्यात जमा होणार

**मुंबई (वृत्तसंस्था)–**मराठवाडा आणि विदर्भात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. या नुकसानीच्या पाहणीनंतर आता राज्य सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. राज्य सरकारने आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत शेतकऱ्यांसाठी पीक नुकसानभरपाई जाहीर केली आहे. खरीप २०२५ मधील पिकांच्या नुकसानीसाठी २२१५ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. मदत आणि पुनर्वसन विभागाने याबाबतचा शासन निर्णय आजच जाहीर केला असून, ही रक्कम आजपासूनच वितरीत केली जाणार आहे.गेल्या काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यामध्ये मराठवाड्यासह विदर्भातील शेतकरी सर्वाधिक बाधित झाले होते. सरकारने केलेल्या पंचनाम्यानुसार, एकूण ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सरकारने तातडीने पाऊल उचलले आहे.

पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. अशा परिस्थितीत त्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. जाहीर झालेली मदत आजच वितरित केली जाणार असून, यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीची भरपाई मिळण्यास मदत होईल. मराठवाड्यासह राज्यातील ज्या-ज्या भागात अतिवृष्टी झाली आहे, त्या सर्व भागांतील शेतकऱ्यांचा या मदतीमध्ये समावेश करण्यात आला आहे. जून २०२५ ते ॉगस्ट २०२५ या कालावधीत अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे झाले होते. त्याकरिता ही मदत असणार आहे.दरम्यान, जुलै महिन्यापासून छत्रपती संभाजीनगरमध्ये ७२१ कोटी, नाशिकमध्ये १३.७७ कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. ऑगस्टमध्ये पुणे विभागासाठी १४.२९, नागपूर विभागाला २३.८५ कोटी आणि अमरावती विभागाला ५६५.६० कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. तर कोकणाला १०.५३ कोटी रुपये देण्याचे निर्देश देण्यात आले होते. ही सगळी मिळून राज्य सरकारने खरीप हंगामासाठी आतापर्यंत २२०० कोटी रुपये देण्याचे निर्देश दिले असल्याचे मंत्री मकरंद पाटील यांनी सांगितले होते.राज्य सरकारच्या वतीने शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी २ हजार २१५ कोटींची मदत आतापर्यंत रिलीज करण्यात आली आहे. मात्र हे सर्व पैसे एकाच जीआरने नाही तर वेगवेगळ्या प्रकारच्या जीआरच्या माध्यमातून देण्यात येत आहे. तसेच ही प्रक्रिया अद्याप थांबलेली नाही. आत्तापर्यंत २,२१५ कोटी रुपयांची मदत आम्ही केली आहे. त्यातले १,८२९ कोटी रुपये पोहोचले आहेत. वाटप झाल्यानंतर देखील शेतकऱ्यांना पूर्ण पैसे मिळण्यासाठी दहा ते बारा दिवसांचा कालावधी लागेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.



## धनेगाव येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न ; १४० नागरिकांची तपासणी



**धनेगाव । प्रतिनिधी**

स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानांतर्गत आरोग्य वर्धिनी केंद्र, धनेगाव येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन गावच्या सरपंच आकांक्षा गुजर यांच्या हस्ते संपन्न झाले.या शिबिरात समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील गोरमाळी यांनी असंसर्गजन्य आजार तपासणी, गरोदर मातांची तपासणी, हेमोग्लोबिन तपासणी तसेच विविध आजारांवर मार्गदर्शन व समुपदेशन केले.दिवसभरात एकूण १४२ नागरिकांची मोफत तपासणी करण्यात आली.शिबिरात एम.पी.डब्लू मनियार कैफ, ज्योती सोनवणे संध्या मुजमुले उषा इंगळे अर्चना मोरे या आशा कार्यकर्त्या

यांच्यासह गावातील नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सततच्या पावसाने झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई द्या -छावा जिल्हा प्रमुख शिवाजी ठोंबरे

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.मोठ्या प्रमाणावर शेतपिके पाण्याखाली गेली असून जनावरांचे तसेच घरांच्या नुकसानी मुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे हाल झाले आहेत.या पार्श्वभूमीवर छावा मराठा संघटने कडून आज केज तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.या निवेदनात असे नमूद करण्यात आले की, मुसळधार पावसामुळे तालुक्यातील विविध गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. पिकांचे मोठ्या प्रमाणा वर नुकसान झालेअसून शेतकऱ्यांचे हातचे



पीक पाण्याखाली गेले आहे. त्याचबरोबर अनेक ठिकाणी जनावरांचा बळी गेला आहे तर घरांचे व वस्तूंचेनुकसान होऊन सामान्य शेतकरी व नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल झाले आहेत.यामुळे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी छावा संघटनेकडून प्रशासनाकडे करण्यात आली.या प्रसंगी छावा मराठा संघटनेचे जिल्हा प्रमुख शिवाजी ठोंबरे, जिल्हा सचिव आसाराम बाबर,दिगंबर तपसे, महादेव धपाटे,भीमराव तपसे आदी पदाधिकारी उपस्थित होते.छावा

संघटनेकडून प्रशासनाने तात्काळ शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे ठोस निर्णय घ्यावेत,अन्यथा छावा संघटना तीव्र आंदोलन छेडेल,असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

## बिबट्या जेरबंद, तळोदा तालुक्यातील ग्रामस्थांना दिलासा

**नंदुरबार । दिपक गोसावी**

गेल्या काही दिवसांपासून तळोदा तालुक्यातील प्रतापपूर-गोपाळपूर शिवारात बिबट्याच्या मुक्त संचारामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण होते. अखेर वनविभागाच्या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे आज सकाळी बिबट्याला जेरबंद करण्यात यश आले आहे, ज्यामुळे पंचक्रोशीतील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

गेल्या आठवड्यात काही शेतकऱ्यांनी बिबट्याला फिरताना पाहिले होते. त्याच्या पावलांचे ठसेही अनेक ठिकाणी आढळले. ही माहिती मिळताच वनविभागाने तात्काळ दखल घेतली. प्रतापपूरचे सरपंच पंकज पावरा यांच्या ऊसाच्या शेतात एक पिंजरा लावण्यात आला आणि सापळा रचण्यात आला.

रात्रीच्या वेळी बिबट्या पिंजऱ्यात



अडकल्याची माहिती वनविभागाला मिळाली. सकाळी वन अधिकारी आणि त्यांच्या टीमने घटनास्थळी पोहोचून बिबट्याला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. हा बिबट्या अंदाजे ३ ते ४ वर्षांचा असून, तो पूर्णपणे निरोगी आहे.

या तात्काळ कारवाईबद्दल स्थानिक नागरिकांनी वनविभागाचे विशेष कौतुक केले आहे. सतत रात्री शेतात जाणे टाळावे लागत असल्यामुळे शेतकरी त्रस्त होते, पण आता बिबट्या पकडल्याने त्यांना हायसे वाटत आहे. आता बिबट्या पकडला गेल्याने हायसं वाटतंय, असे म्हणत एका स्थानिक शेतकऱ्याने आपल्या भावना व्यक्त केल्या.ही घटना मानव आणि वन्यजीव यांच्यातील वाढता संघर्ष दर्शवते. वनविभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि कोणतीही माहिती तात्काळ कळवण्याचे आवाहन केले आहे. वनक्षेत्रपाल एसबी सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील वनपाल बीबी सयाईस, वनरक्षक संदिप भंडारी, राहुल कोकणी, विरसिंग पावरा, महेंद्र तडवी, जान्या पाडवी, जेकमसिंग वसावे, नामदेव डोंगरे, अमरसिंग वसावे, आणि आशूतोष पावरा यांनी ही कामगिरी यशस्वी केली.

## नंदुरबार जिल्ह्यात रंगावली धरणातून विसर्ग सुरू-प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा

**नंदुरबार । दिपक गोसावी**

रंगावली मध्यम प्रकल्प (ता. नवापूर, जि. नंदुरबार) पूर्ण क्षमतेने भरला असून पावसामुळे पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. सध्या धरणाची पाणी पातळी २२७.०० मीटर वर पोहोचली असून प्रकल्प १००% क्षमतेने भरला आहे. त्यामुळे दि. २३ सप्टेंबर २०२५ सकाळपासून धरणाच्या सांडव्यावरून १५,९१५ क्युसेक विसर्ग सुरू आहे.

**प्रशासनाचा इशारा–**रंगावली नदीकाठच्या या गावांमध्ये सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.उन्बर्डी, खर्बर्डी, प्रतापपूर, चौकी, बोकळझर, रायपूर, धनराट, नांदवन, विजापूर, मोरथवा, वाग्ळापाडा आणि नवापूर - नदीपात्रात गुरेढोरे किंवा मनुष्य न पाठविण्याचे तसेच आवश्यक ती खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**खोकसा परिसरात–**रात्री ३ वाजल्यापासून मुसळधार पाऊस झाला, सकाळी ६



वाजल्यानंतर पावसाचा जोर कमी झाला.

चौकी-रायपूर पूल: पाण्याखाली गेल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे.

नागझरी पूल: पाणी ओसरल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरू झाली आहे.

**नागरिकांना आवाहन–**कार्यकारी अभियंता, धुळे पाटबंधारे विभाग, धुळे व सहाय्यक अभियंता श्रेणी-१, पाटबंधारे उपविभाग, नंदुरबार यांच्या वतीने नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे, नदीकाठाजवळ जाणे टाळण्याचे आणि सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्या-खा.रजनीताई पाटील

**केज । प्रतिनिधी**

मागील पंधरा दिवसा पासून बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.शेतकऱ्यांची शेती मातीसकट वाहून गेली आहे.जनावरे गुरे वाहून गेली आहेत.बीड जिल्ह्यात ओलादुष्काळ जाहीर करून सरसकट ५० हजार रुपये शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.रजनीताई पाटील यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी ५० हजारांची मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे.

सध्या बीड जिल्ह्यात सर्वच तालुक्यात पावसाने मोठे नुकसान झाले असुन सोयाबीन, कापुस पुर्णतः हातातुन गेले आहे.नदीकाठचे घरे,जनावरे वाहुन गेली असुन प्रत्येक गाव या अतिवृष्टीने बाधित झाले आहे कोणतेही पंचनामे न करता जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची अर्थिक मदत तात्काळ द्यावी सद्यस्थितीत जिल्ह्या तील सर्वच नद्या आपले पात्र सोडुन १ ते १.५ कि.मी क्षेत्रातुन वाहत आहेत त्यामुळेअतोनात नुकसान झाले आहे. अनेक गावात पाणी शिरले असुन जनावरांचे गोठे वाहुन गेले असून पशुधनाची देखील जिवीत हानी झाली आहे.त्यामुळे आपण सबंध जिल्हा ओला दुष्काळ म्हणून जाहिर करावा व ज्याची घरे, जनावरे वाहुन गेली त्यांना वेगळी वेगळी मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.शेती हा शेतकऱ्यांचा मुख्य आधार आहे.अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीमुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून त्याला तात्काळ मदतीची गरज आहे. करिता शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळाली पाहिजे थेट मुख्यमंत्र्यांकडे त्यांनी याबाबत मागणी करून संवाद साधला आहे.पुढे बोलताना खा. पाटील म्हणाल्या की, शासनाने तत्परतेने कार्यवाही केली नाही तर शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट होईल.त्यामुळे प्रशासनाने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या विविध योजनांमधून तसेच आपत्ती व्यवस्थापन निधीतून तातडीने मदत देण्यात यावी,अशी मागणी त्यांनी केली.शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून सर्व स्तरांवर लढा देण्याचा निर्धार खा.रजनीताई पाटील यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव बांधील असून, नुकसान भरपाई मिळे पर्यंत पाठपुरावा करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.



## संपादकीय

# 'आयटी' चिंता




अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्व जगावर नुकताच एक अणुबॉम्ब टाकला आहे. तो जपानवर अमेरिकेने टाकलेल्या अणुबॉम्बपेक्षा भयानक आहे. तो बॉम्ब म्हणजे, एचवनबी व्हिसाच्या मूल्यात अमेरिकेने म्हणजे ट्रम्प यांनी तब्बल १ लाख डॉलर्स म्हणजे ८८ लाख रूपये एवढी वाढ केली आहे. अमेरिकेत जाऊन नोकऱ्या मिळवण्याची आणि तेथे अफाट पैसा कमावण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना या निर्णयामुळे चांगलाच तडाखा बसला आहे. १९९१ साली जेव्हा भारतीय क्षेत्र जगाला खुले झाले तेव्हा त्याचा सर्वात जास्त फायदा मध्यमवर्गीयांनी उचलला. यामुळे हा मध्यमवर्ग सर्वात ताकदवान झाला. आर्थिक उदारीकरणानंतर, कित्येक मध्यमवर्गीय तरुण अमेरिकेच्या मार्गाला लागले. आयटी क्षेत्र त्यांच्यासाठी नवीन दालन उघडणारे ठरले. कित्येक तरुण आज डॉलर्समध्ये पगार घेऊ लागले. एक काळ तर असा आला की, अमेरिकन अध्यक्ष कोण हे देखील तेथील इंडियन ठरवू लागले. याचीच सल बहुधा ट्रम्प महाशयांना बोचत असेल.अमेरिकेतील काही कंपन्या अशा आहेत की, त्यांना तेथील स्थानिक लोकांना नोकरीवर ठेवणे परवडत नाही. कारण स्थानिक अमेरिकन लोकांच्या मागण्या भारतीय तरुणांपेक्षा खूप मोठ्या प्रमाणात होत्या. त्यामुळे नोकरीसाठी भारतीय तरुणांनाच प्राधान्य देण्यात आले. अमेरिकेच्या मनात याबाबत विषाद दिसून येतो आणि तोच ट्रम्प यांच्याही मनात असावा. त्यामुळे त्यांनी नव्या व्हिसा धारकांना १ लाख डॉलर्स इतके जबर शुल्क आकारले आहे. यात एक दिलासा आहे तो म्हणजे, सध्या जे अमेरिकत आहेत आणि तेथे नोकऱ्या करत आहेत त्यांना ही शुल्कवाढ लागू नाही. केवळ नवीन व्हिसा धारण करून अमेरिकेत येऊ इच्छिणाऱ्यांसाठीच ही शुल्कवाढ लागू आहे. त्यामुळे हा दिलासा असला तरीही ट्रम्प यांच्या निर्णयामुळे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.अमेरिकेच्या शुल्कवाढीमुळे भारतातील आयटी क्षेत्रात नोकऱ्यांची लाट उसळण्याची शक्यता आहे. कारण अमेरिकेतील ऑनसाईट जॉब महागले असल्याने भारतातील सेवा पुरवठादार कंपन्या युरोपियन देशांकडून हे जॉब करून घेण्याची शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी तर, आयटी क्षेत्रासाठी मोठे पॅकेज जाहीर करणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पण या निर्णयाचा बूमरँग अमेरिकेवर उलटू शकतो असेही काही तज्ज्ञांचे मत आहे. कारण या निर्णयाचा अमेरिकेच्या नवोन्मेष म्हणजे ईनोव्हेशन प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. भारतीय आयटी सर्व्हीस प्रोव्हायडर्स इतर देशांकडून किंवा युरोपियन देशांतील तरुणांकडून रोजगाराचा लाभ घेतील असा हा भारतासाठी दुसरा चांगला परिणाम आहे.ट्रम्प यांच्या या एकाच निर्णयामुळे भारताच्या नोकरी क्षेत्रात उसळी येण्याची शक्यता आहे. कुशल मनुष्यबळाला अमेरिकेत येण्यास संधी नाकारली जात आहे आणि त्याचा परिणाम भारतीय तरुणांना अमेरिकेत नाहीत तर अन्यत्र नोकऱ्यांची संधी निर्माण होण्याची शक्यता आहे; परंतु हा निर्णय भारतातील कुशल मनुष्यबळाला एक तडाखा आहे. भारतीय तरुण हे अमेरिकन तरुणांपेक्षा जास्त कुशल आहेत आणि त्यांच्यापेक्षा कितीतरी कमी किमतीत काम करण्यास तयार होतात. यामुळे ट्रम्प यांनी हा कुटिल डाव खेळला आहे. आतापासूनच हा निर्णय अमलात येत आहे. भारतीय आयटी कंपन्यांवर या निर्णयाचा निश्चितच वाईट परिणाम होणार आहे. कारण जे कर्मचारी या व्हिसावर अवलंबून आहेत त्यांना उच्च किमतीचा सामना करावा लागेल. त्यामुळे टीसीएस आणि इन्फोसिससारख्या कंपन्या अडचणीत येऊ शकतात. पण असे असले तरीही सिल्व्हर लायनिंगप्रमाणे या संकटातही सुखद बाजू ही आहे की इतर देशांतून विशेषतः युरोपियन कंपन्यांत भारताला संधी आहे आणि ती आता गमावून चालणार नाही.या निर्णयाचा दुसरा एक परिणाम होणार आहे तो म्हणजे आता ऑटोमेशन आणि न्यू एन्ट्रंन्टसना संधी कमी असतील. तशाही त्या एआयमुळे कमी झाल्याच होत्या. ती प्रक्रिया आता अधिक गतिमान होईल. त्यामुळे आयटी क्षेत्रातील नव्याने पदार्पण करणाऱ्यांना संधी कमी होतील. त्याना अधिक प्रमाणात आपली क्षमता सिद्ध करावी लागेल, इतकेच नव्हे तर पूर्वीसारखे जे जॉब्स मिळाले की आयुष्यभर तेथेच राहून सारे लाभ घेत राहायचे ही वृत्ती संपून जाईल. कारण अमेरिकन निर्णयामुळेच नव्हे तर एआयमुळेच या प्रवृत्तीला शेवटचा घाव बसला होता. आता तो अधिकच गतिमान झाला आहे. अमेरिकेच्या निर्णयाचा सकारात्मक परिणाम झाला आहे तो असा की बंगळूरु आणि गुरूग्राम येथील टेक कंपन्यांकडे अधिक तरुणांचा ओढा वळेल. कारण अमेरिकेची दारे बंद झाली तर साहजिकच हैदराबाद आणि बंगळूरु यासारख्या टेक सिटीजकडे तरुणांचा प्रवाह पुन्हा चालता होईल. पूर्वी जो तो अमेरिकेला जाण्याचे स्वप्न पाहात असे आणि त्यात यशस्वी होत असे. आता ते राहिले नाही तर त्या उलट अमेरिकेपेक्षा अन्य ठिकाणी जाण्याकडे या तरुणांचा कल असेल. ट्रम्प यांनी आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतला आहे. कारण त्याचे परिणाम ट्रम्प प्रशासनाला भोगावे लागणार आहेत. काही दिवस चिंता वाटेल पण भारतीय या संकटावर मात करतील आणि निर्णयाचे भूत गाडून टाकतील यात काही शंका नाही.

# त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारांवर हल्ला; तळोदा तालुक्यातील पत्रकारांकडून तीव्र निषेध

**नंदुरबार । दिपक गोसावी**

त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) येथे काही समाजकंटकांकडून पत्रकार योगेश खरे, किरण ताजणे, आणि अभिजीत सोनवणे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा तळोदा तळोदा तालुक्यातील पत्रकारांनीं तीव्र शब्दांत निषेध केला आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांवरील हा हल्ला म्हणजे लोकशाही मूल्यांवरच हल्ला असल्याची संतप्त प्रतिक्रिया पत्रकार संघाने दिली आहे.त्र्यंबकेश्वर येथे एका बातमीच्या अनुषंगाने माहिती घेत असताना, काही अज्ञात गुंडांनी पत्रकारांना मारहाण करून त्यांना धमकावले. या घटनेमुळे पत्रकार समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तळोदा




येथील पत्रकारांनी या घटनेची गंभीर दखल घेत. दिपक धिवरे तहसीलदार तळोदा यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. या निवेदनात, हल्ल्यातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पत्रकार हे समाजातील गैरकृत्ये आणि भ्रष्टाचाराला वाचा फोडण्याचे महत्त्वाचे काम करतात. अशा परिस्थितीत, त्यांना संरक्षण देण्याऐवजी त्यांच्यावर हल्ले होत असतील, तर ते लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. पत्रकार सुरक्षित असतील तरच लोकशाही सुरक्षित राहील, असे मत पत्रकार संघाने व्यक्त केले. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पत्रकार संरक्षण कायदा तातडीने लागू करावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

या घटनेमुळे राज्यभरातील पत्रकारांमध्ये संतापाची लाट उसळली असून, दोषींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. जर प्रशासनाने यावर लवकरात लवकर कार्यवाही केली नाही, तर तीव्र आंदोलनाचा इशाराही पत्रकार संघटनांनी दिला आहे.

### विसरवाडी–नंदुरबार रस्त्यावर भीषण अपघात

# अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**नवापूर । रसिक गावित**

दिनांक २३ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास विसरवाडी–नंदुरबार रस्त्यावरील बोदवड फाट्याजवळ एका दुर्दैवी अपघातात भरडू गावातील ग्रामपंचायत सदस्य असलेल्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. दिनकर हेमू वसावे (वय ४३) असे मृत तरुणाचे नाव असून, अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिल्याने हा अपघात झाला.



स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनकर वसावे हे आपल्या दुचाकी क्र. एमएच ३९ एएम ९१६२ ने विसरवाडीहून आपल्या मूळगावी भरडू येथे परत जात होते. त्याचवेळी एका अज्ञात आणि भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दिनकर वसावे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच विसरवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नरेंद्र साबळे आणि पोलीस निरीक्षक देविदास वडगुले यांच्यासह पोलीस कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, विसरवाडी येथे पाठवला.

या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विसरवाडी पोलीस या अज्ञात वाहनाचा आणि चालकाचा शोध घेत असून, पुढील तपास विसरवाडी पोलीस करत आहेत.

# नुतन प्रभारी गटशिक्षणाधिकारी केंद्रे यांचा शिक्षकांकडून सत्कार

**केज । प्रतिनिधी**

केज गट साधन केंद्रचे नुतन प्रभारी गट शिक्षणाधिकारी म्हणून सुनिलराव केंद्रे यांची पुनर्नियुक्ती झाल्याने गट साधन केंद्र,केज येथे शिक्षकांच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.या प्रसंगी गट साधन केंद्र कार्यालयात आयोजित कार्यक्रमात शिक्षक गोकुळ सारूक,सुंदर चौरे,सुनिल नेहरकर, बालासाहेब तांदळे, नामदेव चौरे आदी मान्यवर उपस्थित होते. शिक्षक बांधवांनी शाल, श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन केंद्रे यांचे स्वागत केले व त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा दिल्या.सत्कार स्वीकारताना सुनिलराव केंद्रे यांनी उपस्थित शिक्षकांचे आभार मानले.ते म्हणाले कि, शिक्षक हा समाजातील परिवर्तनाचा खरावाहक आहे.गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठीशिक्षकांनी एकत्रितपणे काम केल्यास केज तालुका निश्चितच शैक्षणिक क्षेत्रात आदर्श ठरेल.



यावेळी शिक्षकांनी तालुक्यातील शैक्षणिक घडामोडी,विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास तसेच नवनवीन उपक्रम राबविण्याबाबत चर्चा केली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोकुळ सारूक यांनी केले तर सूत्रसंचालन सुनिल नेहरकर यांनी केले. शेवटी उपस्थित शिक्षकांनी एकमुखाने केंद्रे यांना यशस्वी कार्य काळासाठी शुभेच्छा दिल्या.

# आदिवासी समाजाचा 'आरक्षण बचाव' एल्गार
# मोलगीत हजारो आदिवासींचा जन आक्रोश मोर्चा

**मोलगी । रवींद्र वळवी**

सातपुड्याच्या दुर्गम भागातील आदिवासी बांधवांनी आपल्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आज मोलगी येथे 'आदिवासी आरक्षण बचाव जन आक्रोश मोर्चा' काढला. इतर समाजांना हैदराबाद गॅझेटच्या आधारे आदिवासी आरक्षणाचा लाभ देण्याच्या संभाव्य निर्णयाविरोधात हा मोर्चा काढण्यात आला. यामध्ये हजारो आदिवासी सहभागी झाले होते.

या मोर्चाची सुरुवात बिरसा मुंडा चौकातून झाली. मोर्चातील आंदोलक 'एकच मिशन, आदिवासी आरक्षण!', अशा घोषणा देत बैल बाजारापर्यंत पोहोचले. त्यानंतर अपर तहसील कार्यालयाच्या आवारात मुख्य कार्यक्रम पार पडला.

यावेळी, आदिवासी समाजातील नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि कायदेतज्ज्ञ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी आरक्षणाचे महत्त्व आणि



ते कसे धोक्यात येत आहे, याविषयी सखोल माहिती दिली. आमदार आमश्या पाडवी यांच्यावर झालेल्या जातीवाचक शिवीगाळीचा आणि आदिवासी तरुणांवरील हल्ल्यांचा निषेधही यावेळी करण्यात आला. कार्यक्रमानंतर अपर तहसीलदार यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या प्रमुख मागण्यांमध्ये खालील बाबींचा समावेश होता: हैदराबाद गॅझेटच्या आधारे बंजारा आणि धनगर समाजाला आरक्षण देऊ नये. खोटी जात प्रमाणपत्रे सादर करून नोकरी मिळवणाऱ्या बोगस आदिवासींना तात्काळ बडतर्फ करावे. आमदार आमश्या पाडवी यांना सोशल मीडियावर जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्या घनश्याम हाके याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी. आदिवासींच्या जमिनी बिगर-आदिवासींना भाडेतत्त्वावर देण्याचा शासनाचा प्रस्ताव रद्द करावा. नंदुरबार येथील आदिवासी तरुण जय वळवी याच्या खुनातील आरोपींना जलदगती न्यायालयात खटला चालवून फाशीची शिक्षा द्यावी. निवेदनात प्रशासनाला स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, जर या मागण्यांकडे दुर्लक्ष केले तर संपूर्ण आदिवासी समाज भविष्यात अधिक तीव्र आंदोलन करेल. या मोर्चाचे नेतृत्व राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि वकील बांधवांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी रामसिंग वसावे यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि जय वळवी यांना श्रद्धांजली अर्पण करून मोर्चाची सांगता झाली.

# कृषि महाविद्यालयात 'दीक्षारंभ कार्यक्रम व पालक मेळाव्याचे' कुलगुरू डॉ.इंद्र मणि यांच्या हस्ते उद्घाटन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

कृषि महाविद्यालय अंबाजोगाई येथे नुकतेच १८ सप्टेंबर रोजी, शैक्षणिक वर्ष - २०२५-२६ नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा 'दीक्षारंभ कार्यक्रम व पालक मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमांची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते बळीराजाच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटक तथा मार्गदर्शक म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.इंद्र मणि, वनामकृविचे संचालक शिक्षण, डॉ.भगवान आसेवार, अंबाजोगाई येथील सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, सुप्रसिद्ध व्याख्याता व मानसोपचार तथा व्यसनमुक्ती तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची विशेष उपस्थिती होती. आपल्या उद्घाटनीय मार्गदर्शन पर भाषणात कुलगुरू डॉ.इंद्र मणि म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच संस्कारही अंगीकारले पाहिजेत. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर संघर्ष करायला शिकले पाहिजे. आपण आपल्या प्राप्त केलेल्या ज्ञानाचा उपयोग सेवाभावी वृत्तीने शेतकरी आणि समाजासाठी केला पाहिजे. संचालक शिक्षण डॉ.भगवान आसेवार यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थित पालकांना मार्गदर्शन केले. त्याप्रसंगी ते म्हणाले की, शेती हा आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे कृषि क्षेत्रातील सुधारणा, कृषि क्षेत्राचा



विकास हाच खऱ्या अर्थाने देशाचा विकास होय. याप्रसंगी सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनीही आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान विषयक मार्गदर्शन केले. त्यावेळी ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर अत्यंत डोळसपणे केला पाहिजे. समाजामध्ये हल्ली सायबर गुन्ह्यांचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. त्यामुळे आपण व आपले कुटुंबीय अडचणीत येऊ नये याची खबरदारी घेतली पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून कटाक्षाने दूर राहिले पाहिजे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, विद्यार्थी हा घटक केंद्रीभूत ठेवून महाविद्यालयांनी आपली भूमिका निभावली पाहिजे. ज्ञानसंपन्न आणि संस्कारक्षम विद्यार्थी घडले तर देशही घडत असतो. तेव्हा विद्यार्थ्यांनीही अभ्यासू आणि चिंतनशील वृत्ती अंगीकारली पाहिजे. प्रमुख व्याख्याता म्हणून बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करताना आपल्या प्रेरणादायी भाषणात विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य निर्माण केले. ते म्हणाले की, दुर्दम्य इच्छाशक्ती, कठोर परिश्रम आणि चिकाटी या त्रिसुत्रीच्या बळावर यशाचं शिखर गाठता येते. संघर्ष हाच यशाचा खरा पाया आहे. संघर्षातून मिळालेले यश हे चिरकालीन टिकणारे असते. यावेळी डॉ.इंगोले यांनी आपल्या खुमासदार शैलीत जीवनामध्ये वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये माणसाचे वर्तन कसे असावे, बिकट परिस्थितीला सामोरे कसे जावे, परीक्षेमध्ये यश कसे मिळवावे, अभ्यासात सातत्य कसे, मोबाईलचे व्यसन कसे सोडावे व माणसे कशी जोडावी यावर विस्तृत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंबाजोगाई कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.संजीव बंटेवाड यांनी केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन राजेश रेवले यांनी केले. तर उपस्थितांचे आभार विद्यार्थिनी प्रतिनिधी अभिलाषा खोडके यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# औसा तालुक्यात २९ सप्टेंबर रोजी भव्य आक्रोश निषेध मोर्चा

**औसा । नदिमउल्ला पटेल**

औसा तालुक्यात येत्या २९ सप्टेंबर रोजी भव्य आक्रोश निषेध मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा कानपूर येथे मुस्लिम समाजावरील कारवाई व गैर-संविधानिक एफ.आय.आर. विरोधात आयोजित करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, कानपूर शहरात काही मुस्लिम युवकांनी ख ड्रेंश चींहारारव क्ष असे पोस्टर लावले होते. या प्रकरणी पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हे दाखल करून कारवाई केली. या घटनेमुळे संपूर्ण मुस्लिम समाजात तीव्र संताप निर्माण झाला आहे.

औसा तालुक्यातील समाजबांधवांनी या घटनेविरोधात आवाज उठवण्यासाठी आणि अन्यायकारक कारवाईचा निषेध करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. मोर्चाला विविध सामाजिक संघटना, धार्मिक नेते व स्थानिक नागरिक उपस्थित राहणार असल्याची माहिती मिळाली आहे.आयोजकांच्या म्हणण्यानुसार, हा मोर्चा पूर्णपणे शांततापूर्ण असेल व संविधानिक अधिकारांच्या रक्षणासाठी हा लढा दिला जाणार आहे.

# सप्तशृंगी दुर्गा उत्सवाचे उद्घाटन श्रमिकांच्या हस्ते लक्षवेधी देखावा, महापुरुषांचे भव्य दिव्य पुतळे आकर्षणाचे केंद्र

**परळी । प्रतिनिधी**

सप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेच्या भव्य दुर्गा उत्सवाचे उद्घाटन श्रमिकांच्या हस्ते करण्यात आले. सर्वप्रथम सप्तशृंगी दुर्गा मंदिरा मध्ये श्रमिक यांच्या हस्ते महापूजा व आरती करण्यात आली. या अनोख्या कार्यक्रमात हातगाड्यांपासून हामाली पर्यंत प्रत्येक श्रमिकाचा सहभाग असून, त्यांचा फेटा शाल हार, श्रीफळ येऊन सत्कार व सन्मान करण्यात आला. यामध्ये अशोक लिंबाजी राऊत, बालासाहेब मिसाळ, दीपक शंकर लोंढे, अनुरथ नागोराव ताटे, वैजनाथ फुके, रावसाहेब विठ्ठलराव जगतकर, संजय साळुंखे अशोक काळदाते,विश्वनाथ कुकर यांची उपस्थिती लावली होती. सप्तशृंगी दुर्गा उत्सव आपल्या अनोख्या कार्यपद्धतीमुळे पंचक्रोशीमध्ये प्रसिद्ध आहे. या वर्षी देखावा आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरेल असा तयार करण्यात आला आहे त्यामध्ये प्रामुख्याने नगरपालिकेने सरस्वती नदीच्या कामात जी हलगर्जी केली आहे कडे लक्ष वेधले आहे, व त्याचबरोबर सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांचे आकर्षण देखील या निमित्ताने साकारण्यात आले आहे. महापुरुषांच्या आदर्श सध्याच्या पिढीने घ्यावा व समाजातील द्वेष भावना जातिवाद विसरून एकोप्याने या ठिकाणी वास्तव्य करावे करावे असा संदेश देण्याचा एक अनोखा प्रयत्न केला आहे.

या ठिकाणी भव्य दिव्य दोन हत्ती देखील उभारण्यात आले आहेत व त्या ठिकाणी सेल्फी पॉइंट तयार करण्यात आला आहे, सुरुवातीलाच दोन मोठ्या तोफांची सलामी सप्तशृंगी देवीच्या मंदिराकडे प्रवेश करते वेळेस दिसते. महिलांसाठी स्वतंत्रपणे दांडिया खेळण्यासाठी ग्राउंड तयार करण्यात आले आहे. भव्य दिव्य असा देखावा, जो विचार करायला भाग पाडतो.असा साकारला आहे. उद्घाटनाच्या




दिवशीच भक्तांनी प्रचंड मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. श्रमिकांची मिरवणूक एका उघड्या गाडीमधून काढण्यात आली होती. जेसीबीतून पुष्पवृष्टी श्रमिक कामगारावर करण्यात आली तो क्षण सर्व भाविकांना आकर्षित होता.सप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष तथा परळी नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला आहे. यामध्ये त्यांच्या संस्थेचे सर्व पदाधिकारी, सभासद व दुर्गा उत्सव मंडळाचे कार्यकारणी सदस्य व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड.अर्जुन सोळंके यांनी केले. ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी संपूर्ण कार्यक्रमात पारंपारिक वाद्याचा वापर करून, स्थानिक कलाकारांना प्राधान्य देण्यात आले, ध्वनी प्रदूषण टाळा यासाठी मोटरसायकल वर हुल्लडबाजी व स्टंट करणाऱ्या सैतानी वृत्तीच्या युवकांचा देखील मोटरसायकल रेस प्रकार लक्षवेधी ठरला. यातून ध्वनी प्रदूषण टाळा हा सामाजिक संदेश देखील देण्यात आला आहे.

# सावधान! फेक फोन पे एस.एम.एस व कॉलद्वारे आर्थिक फसवणुकीचा प्रयत्न


**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील अशोक विठ्ठल गायकवाड या व्यक्तीला अज्ञात नंबर वरून संशयास्पद कॉल आला.आणि सांगण्यात आले कि,तुमच्या फोन पे वर २५०००/– रुपये पाठवले आहेत कारण माझा फोन पे नंबर ला पैसे जात नाहीत म्हणून तुमच्या नंबर वर टाकलेत आणि अशोक गायकवाड या व्यक्तीला २५०००/– रुपये आपल्या खात्यात जमा झाले आहेत.असा फोन पे वर आणि टेक्स्ट एस.एम.एस.आला. आलेल्या रकमेतून २,०००/–रुपये मला तात्काळ परत फोन पे वर पाठवा, अशी मागणी केली.मात्र, गायकवाड यांनी तात्काळ आपले खाते तपासले असता, कोणतीही रक्कम जमा झालेली नव्हती. एस.एम.एस.पूर्णपणे फेक असल्याचे स्पष्ट झाले.आश्चर्याची गोष्ट मात्र



दोन्ही व्यक्ती एकमेकांना ओळखत नव्हते.त्यामुळे फसवणुकीचा हा प्रयत्न अपयशी ठरला.मात्र या प्रकारामुळे नागरिकांना पुन्हा एकदा सावध राहण्याचा ईशारा मिळाला आहे.अज्ञात नंबरवरून आलेले फोन किंवा एस.एम.एस.वर विश्वास ठेवू नये,तसेच कोणत्याही प्रकारचे व्यवहार करण्यापूर्वी स्वतःचे बँक खाते तपासून खात्री करून घ्यावी,असे आवाहन करण्यात येत आहे. खोटे एस.एम.एस. आणि कॉलद्वारेआर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार वाढत आहेत.

अशा संदेशांवर विश्वास ठेवून पैसे पाठवू नयेत.त्वरित बँक,पोलिसांना माहिती द्यावी अशी माहिती पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी दिली आहे.




# जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे यश

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

'जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी नोंदवला.यामध्ये मॉडेल व पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत घवघवीत यश मिळवले असून 'केंद्रीय आविष्कार स्पर्धा २०२५' स्पर्धेसाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व सावरकर महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धा आयोजित करण्यातआली होती. स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला.यामध्ये मॉडेल व पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील विद्यार्थी मोमीन अमन याने 'चालकांसाठी डोळे मिटण्याच्या प्रणालीसाठी स्मार्ट मॉनिटरिंग सिस्टीम' या मॉडेल साठी तृतीय पारितोषिक तर तृप्ती सावंत या विद्यार्थिनीला 'सौरऊर्जा ठिबक सिंचन' प्रकल्पासाठी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. यशस्वी दोन्ही विद्यार्थ्यांची निवड 'केंद्रीय आविष्कार स्पर्धा २०२५' स्पर्धेसाठी झाली.

भौतिकशास्त्र विभागातील प्रा. ओमप्रसाद सारगे यांची महाविद्यालय आविष्कार समन्वयक म्हणुन निवड करण्यात आली होती. स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना प्रा. ओमप्रसाद सारगे, प्रा.उमेश राठोड तसेच प्रा जावेद चाऊस , शेख मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे म. शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ऍड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे यांनी अभिनंदन केले व केंद्रीय आविष्कार स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# बस थांब्यांवर प्रवाशांसाठी निवाऱ्याची मागणी–वंचित बहुजन आघाडीने नगरपरिषदेला दिले निवेदन



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या विविध भागांमध्ये अधिकृतपणे बस थांबे आहेत त्या सर्व बस थांब्यावर प्रवाशांना गाडी येईपर्यंत थांबण्यासाठी कसल्याही प्रकारच्या निवाऱ्याची व्यवस्था नसल्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे बस थांब्यावर प्रवाशांसाठी निवाऱ्याची व्यवस्था नसल्यामुळे प्रवाशांना ऊन, वारा, पाऊस याचा सामना करावा लागत आहे खास करून शिक्षणासाठी इतरत्र जाणाऱ्या प्रवासी विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय यामुळे होत आहे तरी शहरांमध्ये नगर नाका, बालेपीर, चऱ्हाठा फाटा, शिवाजीनगर पोलीस स्टेशन, स्वराज्य नगर, बार्शी नाका परळी रोड, बार्शी नाका सोलापूर रोड, मोंढा कॉर्नर या ठिकाणी अधिकृत बस थांबे आहेत त्या सर्व थांब्यावर प्रवाशांकरिता निवाऱ्याची व्यवस्था तात्काळ करण्यात यावी या करिता वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले त्यावेळी उपस्थित जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर जिल्हा सहसंघटक अर्जुन जवंजाळ, सम्यक जिल्हा अध्यक्ष रोहन मगर, शहर अध्यक्ष लखन जोगदंड, शहर महासचिव संदीप जाधव, मिलिंद सरपते इत्यादी उपस्थित होते.

# ईगलवूड समुहाच्या वतीने दांडीया नाईटचे आयोजन

## जास्तीत जास्त महिलांनी सहभागी व्हावे–डॉ.अर्चना पवार

**महिलांसाठी नवरात्रीचा आनंद आता होणार द्विगुणित**

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

सोमवार दि.२२ रोजी घटस्थापना म्हणजेच शारदीय नवरात्रौत्सवचा प्रारंभ या निमित्त महिला शक्ति चा जागर व्हावा या उद्देशाने सलग तीन दिवस मंगळवार, बुधवार, गुरुवार दि.२३,२४,२५ रोजी सायंकाळी ०६ ते ०९ वाजेपर्यंत भव्य दांडीया नाईट चे आयोजन केले असून माजलगाव येथील महिला व मुलींनसाठी आकर्षक भेटवस्तू जिंकण्याची संधी केवळ महिलांसाठी नारी शक्तिचा जागर व्हावा या उद्देशाने या भव्य दांडीया नाईट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.यावर्षी नवरात्रोत्सवात माजलगाव येथील सर्व महिला भगिनींन साठी भव्य दांडीया नाईट चे आयोजन ईगलवूड इंग्लिश स्कूल, ईगलवूड पॉलिटेक्निक अँन्ड इंजीनियरिंग कॉलेज आणि ईगलवूड लिटल चॅम्प्स घ्या वतीने करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमांमध्ये माजलगाव शहरातील सर्व माता–भगिनी – युवतींनी सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.अर्चना पवार यांनी केले आहे.



# हिंदी भाषी फाउंडेशनतर्फे आदर्श शिक्षक समारंभाचे भव्य आयोजन



**मुंबई । प्रतिनिधी**

हिंदी भाषी फाउंडेशन या सामाजिक संस्थेतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ दिनांक २१ सप्टेंबर २०२५ रोजी साईनाथ हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या प्रांगणात यशस्वीरीत्या पार पडला.या प्रसंगी संपूर्ण मुंबईतील शिक्षकांकडून प्राप्त नामांकनांतून १५ शिक्षकांची निवड करून त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माननीय श्री. निलय बुनकर (आय.आर.एस., संयुक्त आयुक्त) तसेच विशेष पाहुणे म्हणून माननीय श्री. हरिवंश सिंह, माजी खासदार उपस्थित होते. आदरणीय शिक्षकांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व शाल अर्पण करून त्यांचा गौरव करण्यात आला.मुख्य पाहुणे माननीय श्री. निलय बुनकर यांनी आपल्या प्रेरणादायी उद्बोधनात सांगितले की – शिक्षक हे समाज व राष्ट्रनिर्मितीचे आधारस्तंभ आहेत. विद्यार्थ्यांच्या जीवनातील त्यांचे योगदान कधीही मोजता येणार नाही. अशा प्रकारचे कार्यक्रम शिक्षकांना प्रोत्साहन देतात आणि शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करण्यासाठी प्रेरणा देतात.श्री. निलय बुनकर यांनी शिक्षकांच्या सन्मानार्थ आयोजित या अर्थपूर्ण उपक्रमाचे कौतुक करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. आनंद सिंह व महिला अध्यक्षा श्रीमती संगीता सिंह यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.विशेष पाहुणे श्री. कुंवर हरिवंश सिंह यांनी आपल्या आशीर्वचनात कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाचे कौतुक करून हिंदी भाषी फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांना भविष्यातही समाजाला प्रेरित करणाऱ्या उपक्रमांत आपला संपूर्ण सहकार्याचा शब्द दिला.कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी एडवोकेट विशाल सिंह, आर.एस. सिंह, मनोज सिंह, पी. कुमार, जोगिंदर सिंह, संजय सिंह, आलोक सिंह, हेमंत सिंह, आलेख उपाध्याय, योगेश तिवारी, प्रशांत द्विवेदी आणि अलका शर्मा मुख्यत्वे उपस्थित होते.हिंदी भाषी फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. आनंद सिंह यांनी आपल्या मनोगतात म्हटले की –भविष्यातही हिंदी भाषी फाउंडेशनचा हा सातत्यपूर्ण प्रयत्न राहील की आम्ही समाजाप्रती आपली जबाबदारी निष्ठेने पार पाडत राहू आणि अशा प्रकारचे अर्थपूर्ण तसेच जनकल्याणकारी कार्यक्रम सतत आयोजित करत राहू.

# मेट्रोचे सर्व टप्पे २०२६ अखेर पर्यंत प्रवाशांकरिता खुले होतील–मुख्यमंत्री

## ठाण्यातील वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लागेल–उपमुख्यमंत्री

**ठाणे । प्रतिनिधी**

ठाण्यातील मेट्रो ४ आणि मेट्रो ४ अ या मार्गिका वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्सला जोडणाऱ्या मेट्रो ११ या मार्गिकेला जोडण्यात येणार असल्याने ही ५८ किमी लांबीची देशातील सर्वात मोठी मेट्रो मार्गिका ठाणेकर आणि मुंबईकरांसाठी उपलब्ध होणार आहे. पुढच्या वर्षाच्या शेवटापर्यंत या मेट्रोचे सर्व टप्पे प्रवाशांकरिता खुले होतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मेट्रो मार्ग ४ (वडाळा–कासारवडवली) व ४ अ (कासारवडवली–गायमुख) च्या टप्पा–१ गायमुख जंक्शन गायमुख गाव– घोडबंदर रोड– कासारवडवली– विजय गार्डन या मार्गिकेच्या प्राधान्य विभागावर तांत्रिक तपासणी व ट्रायल रनची सुरुवात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आली. प्रसंगी उपमुख्यमंत्री तथा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) अध्यक्ष एकनाथ शिंदे, राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार निरंजन डावखरे, माजी आमदार रवींद्र फाटक, मुंबई



महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव नवीन सोना, कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ तसेच नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मेट्रो मार्ग ४ आणि ४ अ बद्दल माहिती देताना म्हणाले की, घाटकोपर–मुलुंड –गायमुख या मेट्रो मार्गिकेची एकूण लांबी ३५ किलोमीटर असून मेट्रो ४ ची ३२ कि.मी. आणि मेट्रो ४ अ ची २.८८ कि.मी. आहे. मार्गिकेत एकूण ३२ स्थानके असून या प्रकल्पासाठी १६ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. मेट्रो ४, मेट्रो ४ अ, मेट्रो १० आणि मेट्रो ११ या सर्व मेट्रोसाठी डेपो तयार करण्याकरिता भोगरपाडा येथे ४५ हेक्टर जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या मेट्रो मार्गिकेचा विशेष फायदा असा आहे की, पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे, मुंबई शहर आणि ठाणे शहर या सर्व मार्गांना जोडणारा हा मार्ग असणार आहे. पुढे ही मार्गिका वडाळा ते छत्रपती शिवाजी टर्मिनसला जोडणाऱ्या मेट्रो ११ ला जाडली जाणार आहे. त्यामुळे ही ५८ किमी लांबीची देशातील सगळ्यात मोठी मेट्रो मार्गिका निर्माण होणार आहे. या मेट्रोच्या सर्व मार्गिका सुरु झाल्यावर यामध्ये १३ लाखापेक्षा जास्त दैनंदीन प्रवासी प्रवास करतील. या मेट्रोमुळे रस्त्यावरची वाहतूक मोठ्या प्रमाणात कमी होईल. पुढच्या वर्षाच्या शेवटापर्यंत या मेट्रोचे टप्प्याटप्प्याने सर्व टप्पे प्रवशांकरिता खुले झाले पाहिजेत असा प्रयत्न आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

# महाराष्ट्रावर पावसाचे सावट कायम मराठवाड्यात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून महत्त्वाची सूचना

**मुंबई (वृत्तसंस्था)**–गेल्या १५ दिवसांपासून राज्यात मुसळधार पाऊस सुरू असून, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यातच, हवामान विभागाने पुन्हा एकदा मान्सून सक्रिय होणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. बंगालच्या उपसागरावर २४ सप्टेंबर रोजी कमी दाबाचा पट्टा निर्माण होत असल्याने, त्याचा परिणाम २८ सप्टेंबरपर्यंत महाराष्ट्रावर जाणवण्याची शक्यता आहे. यामुळे राज्यातील विविध भागांमध्ये ढगाळ हवामान राहील आणि पावसाचा जोर वाढू शकतो.

सोमवारी मध्यरात्रीपासून सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मराठवाड्यात गेल्या आठवडाभरापासून सर्वदूर जोरदार पाऊस झाला आहे. अनेक मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाल्याने शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.बीड आणि धाराशिव जिल्ह्यांसह मराठवाड्यातील बहुतांश ठिकाणी धरणांचे दरवाजे उघडण्यात आल्यामुळे नद्यांना



पूर आला आहे. यामुळे सखल भागातील गावांमध्ये पाणी शिरून परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. शेतकऱ्यांनी पिकांच्या नुकसानीमुळे शासनाकडे तातडीने मदतीची मागणी केली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, २ ते २५ सप्टेंबरदरम्यान राज्यातील अनेक भागांमध्ये मेघगर्जनेसह वादळी पाऊस होण्याची शक्यता आहे. विशेषतः हा पाऊस दुपारनंतर अधिक प्रमाणात पडेल असा अंदाज वर्तवला जातोय. या कालावधीत काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होईल. मात्र २६ सप्टेंबरपासून कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव राज्यभर दिसून येईल.

# खा.बजरंग सोनवणे पुरग्रस्तांच्या भेटीला मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचा शब्द

## शेतकऱ्यांचे पुसले आश्रू,केज,अंबाजोगाई तालुक्यात दिल्या भेटी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. मंगळवारी पहाटे जिल्ह्यातील ५७ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली असून खा.बजरंग सोनवणे मागील आठ दिवसांपुर्वी झालेल्या अतिवृष्टीची पाहणी करून दिल्लीला गेले होते. यानंतर मागे पुन्हा अतिवृष्टी झाल्याने ते तातडीने मंगळवारी सकाळी बीडला रवाना झाले. यानंतर दुपारी त्यांनी धानोरा, देवळा (ता.अंबाजोगाई) आणि इस्थळ (ता.केज) येथे अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली.बीड जिल्ह्यात दि.१४ सप्टेंबरपासून अतिवृष्टी होत आहे. पहिल्यांदा अतिवृष्टी झाली तेव्हा तातडीने खा.बजरंग सोनवणे यांनी बांधावर जावून पिकाची पाहणी केली होती. यानंतर काही दिवसाने पाऊस थांबला होता. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे हे दिल्ली येथे जिल्ह्याच्या विकास कामाच्या निमीत्ताने गेले होते. यानंतर बीड जिल्ह्यात पावसाने सुरूवात केली. सलग तीन दिवसांपूसन बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झालेली आहे. यामुळे नद्याना महापूर आलेला आहे. या पुरात शेती आणि पिकेही वाहून गेली आहेत. अनेक शेतकऱ्यांचे पशुधनही वाहून गेले असून कोट्यावधी रूपयांचे नुकसान झालेले आहे. मागील काही दिवसांपासून शेतात पाणी असल्याने पिके पिवळी पडत आहेत. शिवाय पुरामुळे शेती खरडून गेली असून आता पुन्हा शेतकऱ्यांनी शेती करायची कशी असा प्रश्न आहे. मंगळवारी खा.बजरंग सोनवणे हे दिल्लीवरून शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी परतले. यानंतर त्यांनी केज आणि अंबाजोगाई तालुक्यातील विविध गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त शेतकरी, आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. कोणतीही अडचण वाटली तर संपर्क करा, तुम्हाला शासनस्तरावर मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करू, वेळप्रसंगी शासनाला भांडू परंतु मदत मिळवून देऊ, असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.



### आज पाटोदा, शिरूर बीड दौरा

खा.बजरंग सोनवणे हे आज पाटोदा, शिरूर आणि बीड तालुक्यातून वाहणाऱ्या मोठ्या नद्यामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करणार आहेत. पाटोदा, शिरूर शहरात पाणी शिरूर त्याठिकाणी व्यापाऱ्यांचेही मोठे नुकसान झाले होते. त्याठिकाणी देखील ते भेटी देणार आहेत. तर बीड तालुक्यात सिंदफणामुळे जिथे नुकसान झाले आहेत, अशा ठिकाणी शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

## बिड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करा–बाळासाहेब सोनटक्के

**धारुर । प्रतिनिधी**

आठ दिवसापासून झालेल्या अतिवृष्टी मुळे खरिप हंगामातील पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड प्रमाणात आर्थिक फटका बसला असल्याने शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून तातडीने आर्थिक मदत करावी अशी मागणी सत्यशोधक ओबीसी परिषदेचे धारुर ता. अध्यक्ष बाळासाहेब सोनटक्के यांनी केले आहे.



सलग आठ दिवस अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील नदी नाले तुडुंब भरले आहेत, नदी नाल्याचे पाणी शेतात शिरल्याने तलावाचे स्वरूप आले आहे.ऐन भरात आलेली पिके आता पदरातच पडणार होते मात्र शेतकऱ्याचा तोंडातला घास निसर्गाने हिराहून घेतला आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीवर अक्षर शः पाणी फिरले आहे कापूस सोयाबीन हे नगदी पिके आहेत नगदी पिके घेऊन त्यातून निघणाऱ्या उत्पन्नातून कुटुंबाचा जगण्याचा प्रश्न सुटेल म्हणून शेतकऱ्यांनी बी बियाणे खाते औषध यावर मोठ्या प्रमाणात खर्च केला होता मात्र तेलही गेले आणि तूपही गेले अशी अवस्था शेतकऱ्याची झाली आहे त्यामुळे शासनाने शेतकऱ्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करून शेतकऱ्यांना कोसळलेल्या संकटांमधून तातडीने बाहेर काढावे यासाठी ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर आर्थिक मदत पाठवावी अशी मागणी सत्यशोधक ओबीसी परिषदेचे धारूर तालुका अध्यक्ष बाळासाहेब सोनटक्के यांनी शासनाकडे केली आहे.

## बोरद विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

**बोरद । मंगेश पाटील**

बोरद विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २३ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी १ वाजता संस्थेचे माजी चेअरमन कृष्णदास काशिनाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.



सभेची सुरुवात संस्थेचे दिवंगत सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि देशासाठी शहीद झालेल्या शूर जवानांना दोन मिनिटे उभं राहून श्रद्धांजली अर्पण करून झाली. त्यानंतर, संस्थेचे सचिव जयपाल कुवर यांनी मागील कामकाजाची नोंद मंजूर केली. सन २०२४-२५ वर्षाचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करण्यात आले. तसेच, सन २०२५-२६ साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. ऑडिटर यांच्याकडून आलेला मेमो दुरुस्तीसह वाचून सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.

यावेळी, संस्थेचे माजी संचालक दत्तात्रय पाटील यांनी संस्थेच्या १९५९ साली बांधलेल्या जुन्या इमारतीचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी ही इमारत जीर्ण झाल्याने नवीन इमारत बांधण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचना केली. ही संस्था सभासदांची असल्याने सर्वांनी संस्थेच्या विकासासाठी मदत करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या सभेमध्ये बोरद विकास सोसायटीच्या व्हाईस चेअरमनपदी सोमनाथ चौधरी यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल अध्यक्ष कृष्णदास पाटील यांनी त्यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी चेअरमनसह सर्व संचालक मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषीधन अधिकारी कृष्णा काळे यांनी शेतकऱ्यांना केळी, पपई आणि ऊस पिकांविषयी सखोल मार्गदर्शन केले. सभेच्या शेवटी, उपस्थितांचे आभार गोविंद रामू पाटील यांनी मानले. सभेची सांगता चहा आणि नाश्ता घेऊन झाली. ही सभा अत्यंत उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

## केज तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी ५० हजाराची मदत द्या

### जेष्ठ नेते रमेश आडसकरांचे तहसीलदारांना निवेदन

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात सततच्या मुसळधार पावसाने सोयाबीन पिकांसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून नदी काठच्या गावातील जमिनी पूर्णपणे पिकांसह खरडून गेल्या आहेत. त्यामुळे शासनाने तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून पंचनामे न करता सरगट हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) जेष्ठ नेते रमेश आडसकर यांनी तहसीलदारांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



केज तालुक्यात मागील काही दिवसांपासून सतत मुसळधार पाऊस पडत असून नदी, नाल्यांना पूर येत आहे. शेतात पावसाचे पाणी साचले असून नदीच्या पुराचे पाणी नदी काठच्या गावात आणि जमिनीत शिरले आहे. त्यामुळे नदी काठच्या जमिनी पिकांसह खरडून वाहून गेल्या आहेत. घरांचे नुकसान झाले असून जनावरे ही वाहून गेले आहेत. त्यामुळे पशुधनाची जीवीत हानी झाली आहे. काढणीला आलेले सोयबीन पीक पाणी साचल्याने जाग्यावर सडले असून पूर्णपणे हे पीक हातातून गेले आहे. तर कापुस पिकांचे बोंडे, पाते गळून पडली असून कांदा जाग्यावर सडला आहे. त्याचबरोबर बाजरी, उडीद, मुग ही पिके ही हातातून गेले असून ऊस पिकांच्या सऱ्यामध्ये पाणी साचले असून मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. भाजीपाल्याचे ही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सध्याच्या परिस्थितीत पाऊस थांबण्याचे नाव घेत नसून नद्या पाण्याने भरल्याने आता पात्र सोडून वाहत आहेत. तालुक्यातील प्रत्येक गाव अतिवृष्टीने बाधित झाले असून शासनाने कुठल्याही प्रकारचे पंचनामे न करता तात्काळ सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची अर्थिक मदत देण्यात यावी. तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून ओल्या दुष्काळातील सर्व प्रकारच्या मदती शेतकऱ्यांना देण्यात याव्यात. अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) जेष्ठ नेते रमेश आडसकर यांनी तहसीलदारांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी बाजार समितीचे सभापती अंकुश इंगळे, माजी उपसभापती ऋषीकेश आडसकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अमर पाटील, शहराध्यक्ष अजहर इनामदार यांच्यासह तालुक्यातील माजी जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सदस्य, सरपंच, उपसरपंच, सदस्य, सेवा सोसायटीचे चेअरमन, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तक्षशिला विद्यार्थ्यांनी घेतली न्यायधीश महोदयांची मुलाखत

**नेवासा । प्रतिनिधी**

नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील विधी सेवा समितीच्या वतीने कायदेविषयक जागृती कार्यक्रमाचे आयोजन मंगळवार दिनांक २३ रोजी सकाळी नऊ ते ११ वाजता विधी सेवा समिती नेवासा व नेवासा तालुका वकील संघ यांच्या विद्यमान आणि कायदेविषयक जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला हा कार्यक्रम तक्षशिला इंग्लिश मीडियम स्कूल देडगाव येथे मान्यवराच्या उपस्थितीमध्ये पार पाडला या कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा संत्र न्यायालयाचे न्यायाधीश व अतिरिक्त न्यायाधीश नेवासा श्री आर आर हस्तेकर होते यावेळी बोलताना श्री हस्तेकर म्हणाले विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून जागृत नागरिक व्हावे ज्या देशात नागरिक जागृत असतात येथे कायद्याचे पालन चांगल्या प्रकारे होते सर्वसामान्य जनतेला न्याय देशासाठी सरकारकडून विविध सेवा दिल्या जातात या देशाची माहिती लोकापर्यंत पोहोचण्यासाठी आशा कार्यक्रमाची गरज आहे यावेळी नेवासा तालुका वकील संघाचे अध्यक्षअँड. अजय रिंधे, अँड.ए. वाय. पालवे, अँड.पी.सी. नाहार, अँड. गोकुळ भाताने यांनी विद्यार्थ्यांना कायद्याचे विविध पैल ू आपल्या भाषणातून उलगडून दाखवले.यावेळी तक्षशिला इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी न्यायाधीश महोदयांची मुक्त मुलाखत घेतली. आपण यायाधीश व्हावे असे आपल्याला का वाटले ? यासाठी कोणते शिक्षण घ्यावे लागते? कायदा आण िनियम यात काय फरक असतो? आपल्या देशात मुलांना कोणते कायदेशीर हक्क आण णि जबाबदाऱ्या आहेत? सायबर गुन्हा खूप वाढले आहेत. यापासून स्वतचे संरक्षण करण्यासाठी काय काळजी घ्यायला पाहिजे? समाजातल्या गरीब लोकांना न्याय मिळावा यासाठी सरकार काय प्रयत्न करत आहे? विद्यार्थी म्हणून आम्ही आमच्या देशासाठी आणि समाजासाठी काय मदत करू शकतो? असे विविध प्रश्न विचारून विद्यार्थ्यांनी कुतूहल व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना आर आर हसतेकर यांनी दिलखुलास उत्तरे दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालनशुभांजली दळवी यांनी केलेकार्यक्रमाचे प्रास्ताविक मन्वंतर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा डॉ विजय कदम यांनी केले तर प्राचार्य विठ्ठल कदम यांनी आभार मानलेया कार्यक्रमाकरिता संचालिका शुभांगी कदम, पत्रकार इनुस भाई पठाण, पत्रकार विष्णू मुंगसे व पत्रकार बन्सी भाऊ एडके उपस्थित होते. या कार्यक्रमाकरिता न्यायालयीन अधिकारी व कर्मचारी, वकील संघाचे पदाधिकारी व सदस्य तसेच पक्षकार, नागरिक व विद्यार्थी यांनी उपस्थिती दर्शविलीया कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य संदीप खाटीक उपप्राचार्य मयुरी पवार समन्वयक जॉन दळवी समन्वयक कल्पना पवार यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले .




## शिवसेना डॉक्टर सेलच्या बीड जिल्हा प्रमुखपदी डॉ.किरण वनवे यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

वंदनीय हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व धर्मवीर आनंद दिघे यांच्या कर्तुवाला स्मरून व शिवसेना पक्ष प्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार तसेच प्रदेश प्रमुख डॉक्टर सेलचे डॉ.धनंजय गोविंदराव पडवळ, यांच्या नेतृत्वाखाली डॉ.किरण वनवे यांची शिवसेना डॉक्टर सेल अंतर्गत डेंटल विंग,बीड जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे.वंदनीय हिंदूहृदसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार व धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांचे विचार तळागाळात पोहचवून पक्ष वाढीसाठी व सर्व सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहू,असे डॉ. किरण वनवे यांनी सांगितले.त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



## जीवाची वाडी येथे सोयबीन खरेदी सुरू

**येवता । प्रतिनिधी**

दि.२२ रोजी केज तालुक्यातील जीवाची वाडी येथे याही वर्षी सोयबीन खरेदी चालु करून येतील तरुण श्री.राम अनंता चौरे यांनी प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी दि.२२/०९/२०२५- सोमवारी - सकाळी जय भगवानबाबा दुकानाचे उध्दघाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले,आजचा सोयबीनचा भाव रू.४२००काढुन खरेदी करन्यात आली असुन जीवाची वाडी-तुकूचीवाडी-रानुबाईची वाडी व परीसरातील शेतकऱ्यांना स्थानीक ठिकाणी खरेदी चालु केल्याने चांगल्या प्रकारे भाव देऊन खरेदी सुरु केल्याने सर्व शेतकऱ्यांन कडून राम चौरे यांचे सर्व स्तरातुन कौतुक केले जात आहे.कार्यक्रम प्रसंगी उपस्थीत आंकुश मोराळे,श्रीराम चाटे,गोकुळ सारूक,राजाभाऊ चौरे, शेषेराव चौरे,पिंटू महाराज,राम चौरे अभिमान चौरे,जयसिंग चौरे इत्यादी उपस्थित होते.



## नंदकिशोर सजगणे यांना बंधूशोक

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील तेलगव खु. येथील माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक चे नंदकिशोर सजगणे यांचे लहाने बंधू गोविंद सजगणे हे हैदराबाद येथे इंजिअर म्हणून कार्यरत होते परंतू आपले कार्यलयीन काम आटोपुन १९ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता त्यांचे रेल्वे मध्ये अपघाती निधन झाले असून त्यांचा अंत्यविधी २० सप्टेंबर रोजा ७:३० वाजता तेलगाव खु.ठिकानी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले गोविंद हे गावात अत्यंत शांत संयमी म्हणून परिचित होते त्यांचे अवघे वयाच्या ३० व्या वर्षी अपघाती निधनाची वार्ता समजताच पंचक्रोशीतील नागरिकांनी व प्रतिष्ठित नागरिक यांनी यावेळी हळहळ व्यक्त केली त्यांच्या पच्यात आई,वडील,पत्नी,बहीण, दोन मुली असा परिवार असून ते बाजार समितीचे संचालक नंदकिशोर सजगणे यांचे लहान बंधू होत.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077